# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ७४-२२** **दिनांक - ०७/०३/२०२२**

## मसाज नावाखाली वेश्याव्यवसाय चालविणा-या ओशन स्पा वरती अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाची कारवाई

दिनांक ०४.०३.२०२२ रोजी अनैतिक मानवी प्रतिबंध कक्षाचे वपोनि श्री एस.एस.पाटील यांना त्यांचे विश्वासनीय बातमीदाराकडुन माहीती मिळाली की, “ओशन स्पा” गाळा नं.एफ-१३६, बिल्डीग नं.६, पुनम सृष्टी को.ऑ.हौ. सोसायटी, लतिफ पार्क, मिरा-भाईंदर रोड, एस.के. स्टोन मिरारोड पूर्व या स्पाचा व्यवस्थापक पुरुष गि-हाईकाडून मसाज व वेश्यागमनाच्या मोबदल्यात २५००/- रु घेवून मसाजच्या नावाखाली स्पामध्ये ठेवलेल्या मुलीना वेश्यागमनाकरीता पुरवितो.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने वपोनि. श्री. पाटील, यांनी बोगस गि-हाईक व पंच यांना “ओशन स्पा” गाळा नं.एफ-१३६, बिल्डीग नं.६, पुनम सृष्टी को.ऑ.हौ. सोसायटी, लतिफ पार्क, मिरा-भाईंदर रोड, एस.के. स्टोन मिरारोड पूर्व या ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन पोलीस पथकासह १४.२५ वा. छापा टाकला आसता ओशन स्पाचा व्यवस्थापक जेम्स हरंकापूंग वय २७ वर्ष याने बोगस गि-हाईकास ०३ मुलींना दाखवुन, वेश्यागमनासाठी प्रवृत्त करुन, वेश्यागमनाच्या मोबदल्यात रक्कम ठरविली व स्वत:च्या उपजिवीकेकरीता रक्कम स्विकारुन बोगस गि-हाईकाला मुली पुरविल्याने वेश्यागमनाकरीता स्वीकारलेल्या रक्कमेसह ताब्यात घेवुन ०३ पिडित मुलीची सुटका करण्यात आली. सदर बाबत पोहवा/२२६९ उमेश हरी पाटील यांचे फिर्यादीवरुन आरोपी जेम्स हरंकापूंग वय २७ वर्ष याच्या विरुध्द मिरारोड पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I ९२/२०२२ भा.द.वि.सं. कलम ३७० सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ३,४,५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई डॉ.श्री महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि.श्री. संपतराव पाटील, पोहवा/९२०३३ उमेश पाटील, पोहवा/९२०१९ विजय निलंगे, चा.पोना/०६१०६ सम्राट गावडे, सर्व नेम.अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर तसचे मपोशि/१३०६० अफ्रिन जुन्नेदी-भरोसा सेल यांनी केली आहे.

-------------oo-----------------